**प्रेस नोट** **दिनांक १७/०८/२०१९**

मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील टोळी गुन्हेगार, रात्री उशीरा चालणा-या हॉटेल/आस्थापना, प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ वगैरे यावर कारवाई करणेचे आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर व श्री. बच्चन सिंग पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने दि. १७/०८/२०१९ रोजीचे रात्रौ खालील नमूद प्रमाणे कारवाई केलेली आहे.

**युनिट-१ पथकाने** डेक्कन, शिवाजीनगर, फरासखाना पो.स्टे. च्या हद्दीतील १६ टोळी गुन्हेगार चेक केले. त्यापैकी ०७ गुन्हेगार मिळून आले. त्याचप्रमाणे शिवाजीनगर व डेक्कन पो.स्टे. च्या हद्दीतील ०४ हॉटेल / आस्थापना चेक केल्या असता त्या बंद मिळून आल्या.

**युनिट-२ पथकाने** युनिट-२ हद्दीतील १० टोळी गुन्हेगार चेक केले. त्यापैकी ०३ गुन्हेगार मिळून आले. तसेच सहकारनगर पो.स्टे. चे हद्दीत दोन इसम संशयास्पदरित्या फिरताना मिळून आल्याने त्यांची झडती घेता त्यांचेकडे कोयता हे हत्यार मिळून आल्याने त्यांचे विरुध्द आर्म ॲक्ट क. ४ (२५) प्रमाणे कार्यवाही करण्याची तजवीज चालू आहे. त्याचप्रमाणे युनिट हद्दीतील ११ हॉटेल / आस्थापना चेक केल्या असता त्या बंद मिळून आल्या.

**युनिट-३ पथकाने** कोथरुड पो.स्टे. चे हद्दीतील १० टोळी गुन्हेगार चेक केले. त्यापैकी ०७ गुन्हेगार मिळून आले आहेत. तसेच कोथरुड पो.स्टे. चे हद्दीतील ०२ हॉटेल / आस्थापना चेक केल्या असता त्या बंद मिळून आल्या.

**युनिट-४ पथकाने** युनिट हद्दीतील १६ टोळी गुन्हेगार चेक केले. त्यापैकी ०४ गुन्हेगार मिळून आले. तसेच युनिट हद्दीतील ०८ हॉटेल / आस्थापना चेक केल्या. त्यापैकी बराझा हे हॉटेल / आस्थापना शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असल्याने त्यांचे विरुध्द म.पो.का.क. ३३(क्ष) सह १३५ प्रमाणे खटला दाखल करण्यात आला आहे.

**युनिट-५ पथकाने** युनिट हद्दीतील एकूण १६ टोळी गुन्हेगार चेक केले. त्यापैकी ०८ गुन्हेगार मिळून आले. तसेच हडपसर व मुंढवा पो.स्टे. चे हद्दीतील ०९ हॉटेल / आस्थापना चेक केल्या. त्यापेकी बी.एम.जी., अनपलग पब्लीसिटी, एजंट जॅक बार, द टिकी बार हया हॉटेल / आस्थापना शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असल्याचे मिळून आल्याने त्यांचे विरुध्द म.पो.का.क. ३३(क्ष), १३१, १३४ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

**खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक (पूर्व) पथकाने** बिबवेवाडी व कोंढवा पो.स्टे. हद्दीतील १५ टोळी गुन्हेगार चेक केले. त्यापैकी १३ गुन्हेगार मिळून आले. तसेच वानवडी पो.स्टे. च्या हद्दीतील जश्न, सुफी, न्यू सुफी हया हॉटेल / आस्थापना चेक केल्या असता शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असल्याने त्यांचे विरुध्द म.पो.का.क. ३३(क्ष) सह १३५ प्रमाणे खटले दाखल करण्यात आले आहेत.

**खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक (पश्चिम) पथकाने** ११ टोळी गुन्हेगार चेक केले. त्यापैकी ०८ गुन्हेगार मिळून आले. तसेच फरासखाना पो.स्टे. चे हद्दीतील बुधवार पेठ येथील शंकर पान शॉप, नागेश पान शॉप, अब्दुल पान शॉप हे शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असल्याने त्यांचे विरुध्द म.पो.का.क. ३३(क्ष) प्रमाणे खटले दाखल करण्यात आले आहेत.

**सामाजिक सुरक्षा पथकाने** चंदननगर पो.स्टे. च्या हद्दीतील ओराम मसाज सेंटर, शांती बिल्डींग, पहिला मजला, कोलंबिया हॉस्पिटल शेजारी, खराडी बायपास येथील मसाज सेंटरवर छापा टाकून ०१ पिडीत महिलेची सुटका करुन १६,६००/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त केला व ०२ आरोपींविरुध्द चंदननगर पो.स्टे. येथे गु.र.नं. ३१९/१९०२ पिटा ॲक्ट क. ३,४,५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई केलेली आहे.

# दि. १७/०८/२०१९ रोजी रात्रौ गुन्हे शाखेने केलेली कामगिरी

| युनिट / पथक | किती टोळी गुन्हेगार चेक केले | किती मिळून आले | किती हॉटेल / आस्थापना चेक केल्या | किती खटले भरले | इतर कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| **युनिट-१** | १६ | ०७ | ०४ | -- | -- |
| **युनिट-२** | १० | ०३ | ११ | -- | सहकारनगर पो.स्टे. चे हद्दीत ०२ संशयीत इसमांकडे कोयता मिळून आल्याने त्याचे विरुध्द आर्म ॲक्ट क. ४(२५) प्रमाणे कारवाईची तजवीज ठेवली आहे. |
| **युनिट-३** | १० | ०७ | ०२ | -- | -- |
| **युनिट-४** | १० | ०७ | ०८ | ०१ | -- |
| **युनिट-५** | १६ | ०८ | ०९ | ०४ | -- |
| **खंडणी (पूर्व)** | १५ | १३ | ०३ | ०३ | -- |
| **खंडणी (पश्चिम)** | ११ | ०८ | ०३ | ०३ | -- |
| **सामाजिक सुरक्षा विभाग** | -- | -- | -- | -- | चंदननगर ३१९/१९, पिटा ॲक्ट क. ३,४,५ – ०४ आरोपी-४, ०१ पिडीत महिला सुटका व १६,६००/- मुद्देमाल जप्त. |
| **एकूण** | **८४** | **५३** | **४०** | **११** | **१. आर्म ॲक्ट ४(२५) – ०१ कारवाई तजवीज.**<br>**२. पिटा ॲक्ट – ०१ केस** |